नवगण शिक्षण संस्था राजुरीचे

# वंसतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा

ता.पाटोदा जि.बीड

## वाणिज्य विभाग

# औद्योगिक सहल

## अहवाल

**शै.वर्ष २०१८—२०१९**

दि.२६/०२/२०१९ रोजी वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा वाणिज्य विभागा कडुन दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही औद्योगिक सहलीचे अयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना औद्योगीकी करणाची माहीती व्हावी यासाठी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना एखादी कंपनी उत्पादन कशी करते त्या कंपनीचे व्यवस्थापन कशे चालते व उत्पादीत झालेल्या वस्तु कश्या वितरीत केल्या जातात. अशी सर्व माहीती विद्यार्थ्यांना व्हावी हा औद्योगिक सहलीचा उद्देश असतो.

म्हणुन या वर्षी आमच्या महाविद्यालयातील वाणिज्य विभागाने **जलमोती पि.व्ही.सी पाईप कंपनी लि. व जलमोती वॉटर प्युरीफायर कंपनी जामखेड जि. अहमदनगर** येथील कंपनीला दि. २६/०२/२०१९ वार मंगळवार रोजी भेट दिली.

कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकाची पुर्व परवानगी घेवुन कंपनीला भेट दिली. असता कंपनीच्या मुख्य संचालकाशी आंम्ही प्रथामीक स्वरूपाची चर्चा केली.

व मुख्य संचालकाने आमच्या बरोबर **अमोल जाधव हे सुपरवायजर** माहीती देण्यासाठी नियुक्त केले.

प्रथम **अमोल जाधव** यांनी कच्चा माल कोठुन येतो तो कोणत्या दराने खरेदी केला जातो याची कशी काळजी घ्यावी या बद्दत माहीती दिली. नंतर विद्यार्थ्यांना कंपनी मधील यंत्रसामुग्री पाहताना घ्यावयाची काळजी या बद्दल सुचना केल्या.

नंतर पाईप तयार करताना पहिल्या स्टेज वर घेवुन गेले. तेथील कच्चा माल मिक्स करण्याच्या मिक्सर बद्दल माहिती दिली. यामध्ये किती कच्चा माल व कोणते केमीकल किती प्रमाणात घ्यायचे या बद्दल माहिती दिली. कच्चा माल म्हणजेच बुकटी व केमीकल यांची प्रक्रिया कशी होते या बद्दल सविस्तर माहीती दिली. ती विद्यार्थ्यांने समजुन घेतली.

या नंतर प्रक्रिया झालेला माल वेगवेगळया कामासाठी वापरत असल्यामुळे त्या मालाचे कसे प्रमाण घेवुन तो माल विविध प्रकारच्या डायमध्ये कसा पाठवला जातो व तो किती एम.एम चा तयार केला जातो. याची माहिती दिली. वेगवेगळया डायमध्ये तो माल पाठवत असताना केमीकल चे प्रमाण योग्य झाले नाही तर काय परीणाम होतो हे देखील जाधव यांनी सांगितले.

डाय मधुन तो पाईप तयार होताना त्या पाईपला किती प्रमाणत उष्णता देवुन फिनीशिंग कसे केले जाते याची प्रात्यक्षिक करून दाखविले त्यानंतर तयार झालेल्या पाईपवर अत्याधुनिक पध्दतीने कंपनीचे नांव, बॅच नंबर, पाईपची साईज ची प्रिंटीग कसे केले जाते याची माहिती दिली.

पाईप तयार झाल्या नंतर गुणवत्ता नियंत्रण कसे केले जाते याचे देखील माहिती जाधव यांनी लॅब मध्ये प्रत्यक्षिका व्दारे दाखवले.

या नंतर विविध साईजचे पाईप तयार झाल्या नंतर त्याचे गोदामामध्ये कसे विभाजन केले जाते व कसे व्यवस्थीत ठेवले जातात या बद्दल माहिती दिली.

गोदामामध्ये पाईपची वर्गवारी करून डिलरला वितरण करतांना त्याचे नियोजन व वितरण या बद्दल वितरण विभागाच्या प्रमुख धसे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना पाईपचे रेटींग कसे केले जाते याची माहिती दिली. पाईपची किंमत ठरवतांना आपली कंपनी व इतर कंपन्या यांच्या भावाची माहिती घेवुन योग्य भाव ठेवला जातो. जेणे करून रेटिंग मध्ये कमी जास्त पणा होवु नये अशा पध्दतीने विद्यार्थ्यांना कंपनीचे उत्पादन व्यवस्थापन वितरण कश्या पध्दतीने केले जाते या बद्दल माहिती दिली.

यानंतर कंपनीचे व्यवस्थापक श्री कोळपकर सर यांनी विद्यार्थ्यांना चहापान केले.

शेवटी प्राध्यापक डॉ.चंद्रे सर यांनी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक मिथुन बाफना व ललित बाफना यांचे आभार मानले तसेच प्रा.घोडके सर यांनी सुपरवायझर अमोल जाधव यांनी माहिती दिल्या बद्दल आभार मानले. तसेच प्रा.वाघमारे यांनी सर्व कर्मचारी यांचे आभार मानुन औद्योगिक सहलीची सांगता केली.

**प्राचार्य**